# वैश्य सहकारी बँक लि., मुंबई

नोंदणीकृत कार्यालय : ७, तात्या घारपुरे पथ, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ ६५०२
स्थापना : १२-११-१९४५
नोंदणी क्र : १४७५

## ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सभासदांना सूचना

वैश्य सहकारी बँक लि., मुंबई या बँकेची ७३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार, दिनांक २४ ऑगस्ट २०१८ रोजी सायंकाळी ठीक ५.३० वा., दामोदर सभागृह, सोशल सर्व्हिस लिग, एन. एम. जोशी विद्या संकुल, डॉ. आंबेडकर मार्ग, परेल टी. टी., मुंबई - ४०० ०१२** येथे होणार आहे. सभेतील कामकाजाचे विषय खालील प्रमाणे आहेत :

१) दिनांक १४ ऑगस्ट २०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचणे आणि त्यास मंजूरी देणे.

२) दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या संचालक मंडळाने सादर केलेल्या अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

३) दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण केलेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व वैधानिक लेखापरीक्षकांनी सादर केलेल्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

४) आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

५) नफ्याच्या विनियोगास मंजूरी देणे आणि सन २०१७-२०१८ च्या आर्थिक वर्षाकरिता लाभांश जाहीर करणे.

६) सन २०१८-२०१९ च्या अंदाजपत्रकाची व पुढील विकासाच्या योजनांची नोंद घेणे व त्यास मंजूरी देणे.

७) सन २०१९-२०२० सालासाठी समावर्ती / अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळाला देणे.

८) संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठी शासनाने निश्चीत केलेल्या लेखापरीक्षकांच्या नामतालिकेमधून वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

९) वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

१०) माननीय अध्यक्षांच्या संमतीने येणारे इतर विषय.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०४/०८/२०१८

**(भारत अ. साळवी)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना :** सदर सभा गणसंख्येच्या अभावी स्थगित झाल्यास उपविधी क्र. ३५(iii) प्रमाणे त्याच ठिकाणी त्याच दिवशी सायंकाळी ६.०० वाजता वरील कामांचा विचार करण्याकरीता सभेचे कामकाज सुरु होईल आणि त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

**सभेसंबंधी विशेष सूचना :**

१) वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालकांचा अहवाल आणि ताळेबंद, नफा-तोटा पत्रकाबाबत काही सूचना किंवा जे प्रश्न विचारावयाचे असतील ते सभेपूर्वी सात दिवस म्हणजेच दि. १७ ऑगस्ट २०१८ पर्यंत बँकेच्या गिरगांव येथील नोंदणीकृत कार्यालयात कामकाजाच्या वेळेत लेखी आणून द्यावेत. आयत्यावेळी विचारलेल्या प्रश्नांची दखल घेण्याचे बंधन संचालक मंडळावर राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

२) ज्या सभासदांचे पत्ते आणि वारसदार किंवा नावात बदल केले असतील त्यांनी तसे बँकेला लेखी कळवावे.

३) ज्या सभासदांनी तीन वर्षानंतरही लाभांश स्वीकारला नसेल, त्यांच्या लाभांशाची रक्कम राखीव निधीमध्ये जमा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) उपविधी क्र. ३४ (ड) नुसार बँकेच्या वार्षिक अहवालाच्या प्रती सर्व सभासदांना बँकेच्या नजीकच्या शाखेतून अथवा मुख्य कार्यालयातून उपलब्ध केल्या जातील. तसेच सदर अहवाल बँकेच्या **www.vaishyabank.com** या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

५) आर्थिक वर्ष २०१७-२०१८ चा वैधानिक लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण केलेला अहवाल सभासदांसाठी बँकेच्या लोअर परेल येथील मुख्य कार्यालयात कामकाजाच्या वेळेत वाचण्यासाठी उपलब्ध असेल.

६) सभासदांनी सभेला येते वेळी नोटीस बरोबर दिलेला उपस्थिती अर्ज सभेच्या प्रवेशासाठी भरून सभेच्या ठिकाणी देणे बंधनकारक आहे.

**विशेष सूचना - दि. २४ ऑगस्ट २०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता दामोदर सभागृह, परळ टी. टी., मुंबई - ४०० ०१२. येथे मा. श्री. संदीप पाटील - व्यवस्थापक - सहकार भारती प्रशिक्षण संस्था, कराड. यांचे सभासदांसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन आयोजित केले आहे. त्याचवेळी विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम संपन्न हाईल.**